# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

**Accredided by NAAC 'A' Grade**

**CHOICE BASED CREDIT SYATEM**

**Syllabus for**

**Bachelor of Arts (B.A-IIl)**

**Sub-Sanskrit**

**(To be implemented from June, 2020 onwords)**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

वर्ग - बी. ए. भाग – ३, विषय : संस्कृत(DSE-16)

सुधारित / नवीन अभ्यासक्रम(CBCS) जून २०२० पासून

सत्र-५, पेपर क्रमांक – ७

**शीर्षक : वेदोक्त सूक्ते**

Credits: 04 Total Teaching Hours: 60

**प्रास्ताविक :**

प्राचीन भारतीय ज्ञान परंपरेचा आद्य स्रोत ज्यातून उमटतो, ते वेद. मौखिक परंपरेने पठन केल्यामुळे कोणताही बदल न होता, या वेदांचे ज्ञान आज उपलब्ध आहे. प्राचीन ऋषि- मुनींना अनुभवातून स्फुरलेल्या निसर्गातील घटकांचे वर्णन वैदिक सूक्तांमधून केले आहे. या सूक्तांना विशिष्ट पद्धतीने संग्रहित करुन ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद या संहितात विभागले आहे. सांस्कृतिक, सामाजिक व धार्मिक जीवनात वेदांचे स्थान हे महत्त्वपूर्ण आहे. या प्राचीन ज्ञानाचा पारंपारिक दृष्टिकोनासमवेतच, आधुनिक दृष्टिकोनातून अभ्यास करणे आवश्यक आहे.

**उद्दिष्टे :**

१) प्राचीन भारतीय ज्ञान परंपरेचा परिचय करुन देणे.
२) वेदकालीन धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आध्यात्मिक जीवनाचे अध्ययन करणे.
३) वैदिक भाषेच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.
४) वैदिक साहित्याचे आधुनिक दृष्टिकोनातून अवलोकन करणे व उपयुक्तता स्पष्ट करणे.

**फलिते :**

१) प्राचीन भारतीय ज्ञान परंपरा असलेल्या संहितांचा परिचय होतो.
२) वेदकालीन धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आध्यात्मिक जीवनविषयक माहिती मिळते.
३) वैदिक भाषेची वैशिष्ट्यां अभ्यास करतो.
४) आधुनिक काळात वैदिक साहित्याचे आधुनिक दृष्टिकोनातून अवलोकन होते व उपयुक्तता स्पष्ट होते.

**अभ्यासक्रम**

| अनु. क्र. | सूक्ताचे नाव | वेदाचे नाव | मण्डल / अध्याय व सूक्त क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | अग्निसूक्त | ऋग्वेद | १.१ |
| २ | इंद्रसूक्त | ऋग्वेद | २.१२ |
| ३ | उषस्-सूक्त | ऋग्वेद | ३.६१ |
| ४ | अक्षसूक्त | ऋग्वेद | १०.३४ |
| ५ | सरमा-पणि संवाद | ऋग्वेद | १०.१०८ |
| ६ | शिवसंकल्पसूक्त | शुक्लयजुर्वेद | अध्याय ३४ कण्डिका १ ते ६ |
| ७ | राष्ट्राभिवर्धनम् | अथर्ववेद | ०१.२९ |
| ८ | पृथिवीसूक्त | अथर्ववेद | १२.०१ मंत्र क्र.१,२,३,४,५,८,९,१०,११,१२,१५,४५ |

**संदर्भग्रंथ सूची :**

१) श्री अरविन्द. *अग्निमन्त्रमाला-प्रथम:*. पाँडिचेरी : श्रीअरविन्द सोसायटी, प्रथम संस्करण. १९७६.

२) शर्मा उमाशंकर (संपा.). *ऋक्सूक्तनिकर:*. वाराणसी : चौखाम्बा ओरिएन्टालिया, प्रथम संस्करण. १९७१.

३) वेलणकर, पराडकर, जोशी (संपा.). *ऋक्सूक्तवैजयन्ती*. पुणे : वैदिक संशोधन मंडळ, प्रथम संस्करण. १९६५.

४) मुळे रवीन्द्र. *वेददर्शन*. औरंगाबाद : संत ज्ञानेश्वर वेदविद्या प्रतिष्ठान. २००३.

५) सोनटक्के एन. एस. *ऋग्वेदसंहिता*. (सायणभाष्य. खंड १ ते ५) पुणे : वैदिक संशोधन मंडळ. १९७१-१९७२.

**प्रश्नपत्रिका स्वरूप व गुणविभागणी :**

| | |
|---|---|
| प्रश्न १. वस्तुनिष्ठ प्रश्न (बहुपर्यायी) | ०५ गुण |
| प्रश्न २. भाषांतर करा. (३ पैकी २) | १० गुण |
| प्रश्न ३. सामान्यप्रश्न/ सामान्यप्रश्न | १० गुण |
| प्रश्न ४. विवेचक परिच्छेद लिहा. (५ पैकी ३) | १५ गुण |
| | ------------------------ |
| | एकूण गुण - ४० |
| | ------------------------ |

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

वर्ग - बी. ए. भाग ३, विषय : संस्कृत (DSE-E17)

सुधारित / नवीन अभ्यासक्रम (CBCS) जून २०२० पासून

सत्र ५, पेपर क्रमांक - ८

**शीर्षक : वेदान्त**

Credits: 04 Total Teaching Hours: 60

**प्रस्तावना :**

वेदकालीन साहित्यापैकी अंतिम टप्प्यातील साहित्य वेदान्त या नावाने ओळखले जाते. वेदांत साहित्यात प्रामुख्याने उपनिषदांचा समावेश होतो. उपनिषदे ही भारतीय तत्त्वज्ञानाचा पाया आहेत. या उपनिषदीय तत्त्वज्ञानाचा परिचय विद्यार्थ्यांना होणे आवश्यक आहे. या तत्त्वज्ञानाला संक्षिप्तपणे सांगणारा प्रकरणग्रंथ आहे सदानंदयतिंचा वेदांतसार. म्हणून वेदांतसार येथे पाठ्यपुस्तक रूपाने स्वीकारले आहे.

**उद्दिष्टे** :

१) संस्कृतमधील तत्त्वज्ञानाचा परिचय करून देणे.

२) अद्वैत वेदांताची ओळख करून देणे.

३) भारतीय अध्यात्मिक व सांस्कृतिक मूल्यांचा व्यक्तिमत्त्व विकासासाठी विद्यार्थ्यांना उपयोग करून देणे.

४) भारतीय तत्त्वज्ञानाच्या मुळाशी असलेल्या विज्ञानाचा विद्यार्थ्यांना परिचय करून देणे.

**फलिते :**

१) या शास्त्राच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांना संस्कृतमधील तत्त्वज्ञानाचा परिचय होतो.

२) या शास्त्राच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांना अद्वैत वेदांताची ओळख होते.

३) भारतीय अध्यात्मिक व सांस्कृतिक मूल्यांचा व्यक्तिमत्त्व विकासासाठी विद्यार्थ्यांना उपयोग होतो.

४) भारतीय तत्त्वज्ञानाच्या मुळाशी असलेल्या विज्ञानाचा विद्यार्थ्यांना परिचय होतो.

**अभ्यासक्रमासाठी पाठ्यपुस्तक : सदानंदयति-विरचित वेदान्तसार**

**संदर्भ ग्रंथ :**


१) जोग द. वा. (संपा.). *वेदांतसार*. पुणे : प्रथमावृत्ती. १९७१.

२) M. Hiriyanna. *Vedantasarah*. Pune : Oriental Book Agency, 2nd Edition. 1962.

३) चाफेकर नलिनी. *वेदान्तसार*. ठाणे : प्रथमावृत्ती. १९९४.

४) शास्त्री राकेश. *वेदांतसार*. दिल्ली : परिमल प्रकाशन, प्रथम संस्करण, २००३.


**प्रश्नपत्रिकेचे स्वरूप व गुणविभागणी:**

| | |
|---|---|
| प्रश्न १. वस्तुनिष्ठ प्रश्न (बहुपर्यायी) | ०५ गुण |
| प्रश्न २. भाषांतर करा (३ पैकी २) | १० गुण |
| प्रश्न ३. सामान्य प्रश्न/ सामान्य प्रश्न | १० गुण |
| प्रश्न ४. विवेचक परिच्छेद लिहा (५ पैकी ३) | १५ गुण |

---------------

एकूण गुण ४०

----------------

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

वर्ग - बी. ए. भाग ३, विषय : संस्कृत (DSE-E18)

सुधारित / नवीन अभ्यासक्रम (CBCS) जून २०२० पासून

सत्र ५, पेपर क्रमांक - ९

**शीर्षक : तर्कसंग्रह**

Credits: 04 Total Teaching Hours: 60

**प्रस्तावना** :

तर्कशास्त्र ही भारतीय तत्वज्ञानाची एक शाखा आहे. न्याय आणि वैशेषिक असे तत्त्वज्ञानातील दोन विचारप्रवाह तर्कसंग्रह ग्रंथामध्ये एकत्र पहावयास मिळतात. त्यामुळे न्याय आणि वैशेषिक अशा दोन्ही दर्शनशास्त्रांचा अभ्यास तर्कसंग्रह ग्रंथाच्या अभ्यासाने होतो.

**उद्दिष्टे :**

१) प्राचीन भारतीय दर्शन शास्त्रांची ओळख करून देणे.
२) न्याय आणि वैशेषिक दर्शनाचा अभ्यास करणे.
३) प्राचीन भारतीय प्रमाणविचारांचा परिचय करून देणे.
४) संस्कृत तर्कशास्त्राचे आकलन करून घेण्याची क्षमता निर्माण करणे.

**फलिते** :

१) प्राचीन भारतीय दर्शन शास्त्रांची ओळख होते.
२) न्याय आणि वैशेषिक दर्शनाचा अभ्यास होतो.
३) प्राचीन भारतीय प्रमाणविचारांचा परिचय होतो.
४) संस्कृत तर्कशास्त्राचे आकलन करून घेण्याची क्षमता निर्माण होते.

**अभ्यासक्रमाचे पाठ्यपुस्तक : अन्नंभटविरचित तर्कसंग्रह**

**संदर्भग्रंथ** :

१) जोग द. वा. (संपा.). *तर्कसंग्रह.* पुणे : कॉन्टीनेन्टल बुक सर्विस, द्वितीयावृत्ती. १९६६.

२) चाफेकर नलिनी (संपा.). *तर्कसंग्रह.* ठाणे : प्रथमावृत्ती. १९९४.

**प्रश्नपत्रिकेचे स्वरूप व गुणविभागणी:**

| | |
|---|---|
| प्रश्न १. वस्तुनिष्ठ प्रश्न (बहुपर्यायी) | ०५ गुण |
| प्रश्न २. संक्षिप्त टीपा लिहा (८ पैकी ५) | १० गुण |
| प्रश्न ३. सामान्य प्रश्न / सामान्य प्रश्न | १० गुण |
| प्रश्न ४. परिच्छेद लिहा (५ पैकी ३) | १५ गुण |

-------------------

एकूण गुण ४०

-------------------

शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

वर्ग - बी. ए. भाग – ३, विषय : संस्कृत (DSE-E-19)

सुधारित / नवीन अभ्यासक्रम (CBCS) जून २०२० पासून

सत्र – ५, पेपर क्रमांक - १०

**शीर्षक : काव्यशास्त्र**

Credits : 04 Total Teaching hours :60

**प्रस्तावना :**

मम्मटाने साहित्यशास्त्रविषयक ‘काव्यप्रकाश’ हा ग्रंथ लिहिला आहे. दहा उल्लासांमध्ये विभागलेल्या या ग्रंथात काव्यप्रयोजन, काव्यकारणस्वरूप, शब्दशक्ती, अर्थ, रस, ध्वनी, गुण, दोष, अलंकार या काव्यघटकांचे सविस्तर विवेचन केले आहे. या ग्रंथाच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांना काव्यशास्त्राचा परिचय आणि याचे ज्ञान होईल. याबरोबरच काव्यनिर्मिती, काव्यसमीक्षा यासाठी हा अभ्यासक्रम पूरक ठरणार आहे.

**उद्दिष्टे** :

१) संस्कृत काव्यशास्त्राचा परिचय करून देणे.

२) काव्यातील शब्दस्वरुपाचे ज्ञान करून देणे.

३) संस्कृतमधील अलंकारांची ओळख करून देणे.

४) काव्यनिर्मितीची आवड निर्माण करणे.

**फलिते** :

१) विद्यार्थ्यांना संस्कृत काव्यशास्त्राचा परिचय होतो.

२) काव्यशास्त्राच्या अध्ययनाने काव्यातील शब्दस्वरूपाचे ज्ञान करून होते.

३) संस्कृतमधील अलंकारांची ओळख होते.

४) काव्यनिर्मितीची आवड निर्माण होते.

**अभ्यासक्रम :**

१) **पहिला घटक** - द्वितीय उल्लास

२) **दुसरा घटक** - तृतीय उल्लास

३) **तिसरा घटक** - दशम उल्लास (रूपकम्, उत्प्रेक्षा, समासोक्तिः, ससन्देहः, तुल्ययोगिता)

४) **चौथा घटक** - दशम उल्लास ( अर्थान्तरन्यासः, दृष्टान्तः, आक्षेपः, व्याजस्तुतिः, भाविकम्)

**संदर्भग्रंथ :**


१) अर्जुनवाडकर, मंगरुळकर. *काव्यप्रकाश ऑफ मम्मट*. पुणे : देशमुख प्रकाशन.

२) खड्डी सत्य नारायणशास्त्री. *काव्यप्रकाश*. वाराणसी : कृष्णदास अकादमी. १९९७.

३) Chandorkar D. T. *Kavyaprakash of Mammta (X Ullasah)*. Edn.1935.

४) हातवळणे दि. मो. *काव्यप्रकाश*. सातारा : साहित्यसेवा प्रकाशन, प्रथमावृत्ती.

**प्रश्नपत्रिकेचे स्वरूप व गुणविभागणी :**

| | | |
|---|---|---|
| प्रश्न १. | वस्तुनिष्ठ प्रश्न (बहुपर्यायी) | ०५ गुण |
| प्रश्न २. | परिच्छेद लिहा. (३ पैकी २ ) | १० गुण |
| प्रश्न ३. | अलंकार सोदाहरण स्पष्ट करा.( ३ पैकी २ ) | १० गुण |
| प्रश्न ४. | अ) अलंकाराच्या जोडीतील साम्यभेद स्पष्ट करा. | ०५ गुण |
| | ब) सामान्य प्रश्न / सामान्य प्रश्न (५ पैकी ३) | १० गुण |

------------------------

एकूण गुण ४०

-------------------------

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

वर्ग - बी. ए. भाग – ३, विषय : संस्कृत(DSE-E20)

सुधारित / नवीन अभ्यासक्रम(CBCS) जून २०२० पासून

सत्र – ५, पेपर क्रमांक - ११

**शीर्षक : पुरातत्त्वविद्या**

Credits: 04 Total Teaching Hours: 60

**प्रास्ताविक :**

प्राचीनकाळी मुद्रणकलेचा शोध लागलेला नव्हता. त्यामुळे सर्व प्रकारचे लेखन हाताने केले जात असे. ते ताडपत्रे, भूर्जपत्रे, खापर, ताम्रपट, कापड, चामडे, लाकडी पट, वीट, दगड इत्यादीं- वर लिहित असत. ही सर्व हस्तलिखिते नंतरच्या काळात विविध संग्रहालयांमध्ये सुरक्षित ठेवण्यात आलेली आहेत. ही संस्कृत भाषेतील हस्तलिखिते इतिहास संशोधनाची साधने आहेत. संस्कृतभाषेचा अभ्यास करणा-या विद्यार्थ्यांना या हस्तलिखितशास्त्राची अर्थातच पुरातत्त्वविद्येची ओळख व ज्ञान होणे आवश्यक आहे.

**उद्दिष्टे :**

१) संस्कृत हस्तलिखिते आणि अभिलेखांचे ज्ञान होण्यास मदत करणे.

२) संस्कृत पुराविद्येचा परिचय करुन देणे.

३) संस्कृत अभिलेखांचे ऐतिहासिक संशोधनाचे साधन म्हणून अध्ययन करणे.

४) पुराभिलेखांची उपयुक्तता स्पष्ट करणे.

**फलिते :**

१) संस्कृत हस्तलिखिते आणि अभिलेख यांचे ज्ञान होते.

२) संस्कृत पुराविद्येचा परिचय होतो.

३) संस्कृत अभिलेखाचे ऐतिहासिक संशोधनाचे साधन म्हणून अध्ययन होते.

४) पुराभिलेखांचा संशोधनासाठी वापर करतो.

**अभ्यासक्रम**

| अनु. क्र. | घटकाचे नाव |
|---|---|
| १ | हस्तलिखितशास्त्राचा परिचय |
| २ | पुराभिलेखागार |
| ३ | कुषाणकालीन अभिलेख / मौर्योत्तरकालीन अभिलेख :<br>* कनिष्क प्रथमकालीन सारनाथ बौद्ध प्रतिमा अभिलेख<br>* रूद्रदामनचा गिरनार शिलालेख |
| ४ | गुप्तकालीन गुप्तोत्तरकालीन अभिलेख :<br>* प्रभावतीगुप्ताचा पुणे येथील ताम्रपट अभिलेख<br>* चंद्र : मेहरौली लोहस्तंभलेख |

**संदर्भग्रंथ सूची :**


१) गोखले शोभना. *पुराभिलेखविद्या.* पुणे : कॉन्टिनेंटल प्रकाशन. १९७५.

२) शर्मा महावीर प्रसाद. *सामान्य पांडुलिपीविज्ञान.* अपभ्रंश साहित्य अकादमी, प्रथम संस्करण. २००३.

३) सहाय शिवस्वरूप. *भारतीय पुरालेखों का अध्ययन.* मोतीलाल बनारसीदास, तृतीय संस्करण. २०००.

४) हेब्बार गणपती शास्त्री. *भारतीय लिपींचे मौलिक एकरुप.* मुंबई : मोडक श्रीनिवास जनार्दन, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ. १९८८ .


**प्रश्नपत्रिका स्वरूप व गुणविभागणी :**

| | |
|---|---|
| प्रश्न १. वस्तुनिष्ठ प्रश्न (बहुपर्यायी) | ०५ गुण |
| प्रश्न २. सामान्यप्रश्न/ सामान्यप्रश्न | १० गुण |
| प्रश्न ३. सामान्यप्रश्न/ सामान्यप्रश्न | १० गुण |
| प्रश्न ४. परिच्छेद लिहा. (५ पैकी ३) | १५ गुण |
| | एकूण गुण- ४० |

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

वर्ग - बी. ए. भाग - ३, विषय : संस्कृत (DSE-E141)

सुधारित / नवीन अभ्यासक्रम (CBCS) जून २०२० पासून

सत्र ६, पेपर क्रमांक - १२

**शीर्षक : बृहद्संहिता**

Credits: 04 Total Teaching Hours: 60

**प्रस्तावना** :

संस्कृत ही प्राचीन काळापासून ज्ञान विज्ञानाची भाषा आहे. त्यानुसार संस्कृतमध्ये काही प्राचीन साहित्य हे तत्कालीन विज्ञानाचे दर्शन घडविते. त्यापैकी एक ग्रंथ आहे बृहद्संहिता. बृहद्संहिता या ग्रंथाचे कर्ते आचार्य वराहमिहिर होत. हा ग्रंथ प्राचीन काळातील ग्रहगोलनक्षत्र विचारावर प्रकाश टाकतो. तसेच यात पर्यावरणाचाही विचार केलेला आढळतो. या ग्रंथाचा अभ्यास प्राचीन भारतीय विज्ञान जाणून घेण्यासाठी आवश्यक ठरेल.

**उद्दिष्टे :**

१) प्राचीन भारतीय विज्ञानात्मक विचारांना समजून घेणे.

२) पर्यावरणविषयक भारतीय चिंतनाचे पुनरावलोकन करणे.

३) प्राचीन भारतीय विज्ञानाचे सद्यःस्थितीत काय स्थान आहे ते पाहणे.

४) विद्यार्थ्यांना तुलनात्मक विचार करण्यासाठी प्रेरित करणे.

**फलिते :**

१) या अभ्यासक्रमाने प्राचीन भारतीय विज्ञानात्मक विचारांना समजून घेता येते.
२) पर्यावरणविषयक भारतीय चिंतनाचे पुनरावलोकन घडते.
३) प्राचीन भारतीय विज्ञानाचे सद्यःस्थितीत काय स्थान आहे ते कळते.
४) विद्यार्थ्यांना तुलनात्मक विचार करण्यासाठी प्रेरणा मिळते.

**अभ्यासक्रम** :

**१) पहिला घटक** : दकार्गलनिरुपणम् - श्लोक १ - ५०

**२) दुसरा घटक** : वृक्षायुर्वेदविचारः - श्लोक १ - ३१

**३) तिसरा घटक** : सस्यजातकनिरुपणम् - श्लोक १ - १४

**४) चौथा घटक** : प्रवर्षणनिरुपणम् - श्लोक १ - १०

**संदर्भ सूची :**

१) झा सुरकांत( संपा.). *बृहद्संहिता.* वाराणसी : चौखंबा कृष्णदास अकादमी. २०१५.

२) मिश्रा सी. एस. (संपा). *बृहद्संहिता खंड १ व २.* हिंदी संस्करण. २०१२.

**प्रश्नपत्रिका स्वरूप व गुण विभागणी**

| | |
|---|---|
| प्रश्न १. वस्तुनिष्ठ प्रश्न (बहुपर्यायी) | ०५ गुण |
| प्रश्न २. भाषांतर करा (३ पैकी २ ) | १० गुण |
| प्रश्न ३. सामान्य प्रश्न / सामान्य प्रश्न | १० गुण |
| प्रश्न ४. विवेचक परिच्छेद लिहा (५ पैकी ३) | १५ गुण |
| | ----------------------- |
| | एकूण गुण ४० |
| | ----------------------- |

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

वर्ग - बी. ए. भाग ३, विषय - संस्कृत (DSE-E142)

सुधारित / नवीन अभ्यासक्रम (CBCS) जून २०२० पासून

सत्र ६, पेपर क्रमांक - १३

**शीर्षक : याज्ञवल्क्यस्मृती**

Credits: 04 Total Teaching Hours: 60

**प्रस्तावना :**

धर्मशास्त्र हे प्राचीन कालीन न्यायव्यवस्था दाखविणारे ग्रंथ होत. मनुस्मृती, याज्ञवल्क्यस्मृती, पाराशर स्मृती इत्यादि काही धर्मशास्त्र सांगणारे ग्रंथ होत. या ग्रंथांचा अभ्यास करण्याने प्राचीन कालीन न्यायव्यवस्था, समाजव्यवस्था कशी होती त्याचे ज्ञान होते.

**उद्दिष्टे** :

१) स्मृतिग्रंथांचा परिचय करून देणे.

२) स्मृतिग्रंथांपैकी याज्ञवल्क्यस्मृतीचा परिचय करून देणे.

३) व्यवहाराध्यायाचे ज्ञान करून देणे.

४) प्राचीन न्यायव्यवस्थेचा अभ्यास करणे.

**फलिते** :

१) स्मृतिग्रंथांचा परिचय होतो.
२) व्यवहाराध्यायाचे ज्ञान होते.
३) प्राचीन कालीन न्यायव्यवस्थेचा अभ्यास करतो.
४) प्राचीन न्यायव्यवस्थेचा अभ्यास होतो.

**अभ्यासक्रमासाठी पाठ्यपुस्तक : याज्ञवल्क्यस्मृती - व्यवहाराध्याय**

**संदर्भ ग्रंथ :**


१) आपटे ह. ना. (संपा.). *याज्ञवल्क्यस्मृती*. पुणे : आनंदाश्रम, प्रथमावृत्ती. १९६७.
२) बापट विष्णुशास्त्री (संपा.). *श्रीयाज्ञवल्क्यस्मृती*. पुणे. १९२९.
३) विश्वरुपाचार्य. *श्रीयाज्ञवल्क्यस्मृती*. मुन्शीराम मनोहरलाल पब्लिशर्स, प्रथमावृत्ती. १९३९.


**प्रश्नपत्रिकेचे स्वरूप व गुणविभागणी :**

| | |
|---|---|
| प्रश्न १. वस्तुनिष्ठ प्रश्न (बहुपर्यायी) | ०५ गुण |
| प्रश्न २. भाषांतर करा (३ पैकी २) | १० गुण |
| प्रश्न ३. सामान्य प्रश्न/ सामान्य प्रश्न | १० गुण |
| प्रश्न ४. विवेचक परिच्छेद लिहा (५ पैकी ३) | १५ गुण |

--------------------

एकूण गुण ४०

--------------------

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

वर्ग - बी. ए. भाग- ३, विषय : संस्कृत(DSE-E143 )

सुधारित / नवीन अभ्यासक्रम(CBCS) जून २०२० पासून

सत्र-६, पेपर क्रमांक – १४

**शीर्षक : वैदिकसाहित्यावलोकन**

Credits: 04 Total Teaching Hours: 60

**प्रास्ताविक :**

वैदिक साहित्य हा आपला अमूल्य असा ठेवा आहे. वैदिक साहित्याचे चार विभाग आहेत - संहिता, ब्राह्मणे, आरण्यके व उपनिषदे. संहितांमध्ये विविध मंत्र, ऋचा व सूक्ते यांचा समावेश झालेला आहे. ब्राह्मणग्रंथांमध्ये यज्ञविषयक विधींच्या सर्व प्रकारच्या माहितीचा अंतर्भाव होतो. अरण्यामध्ये निर्माण झालेल्या रचना म्हणजे आरण्यक ग्रंथ, तर अध्यात्म व तत्त्वज्ञान यांनी परिपूर्ण रचना म्हणजे उपनिषदे. या साहित्यामध्ये अंतर्भूत सर्वांगीण बाबींचा अभ्यास आजच्या काळात आवश्यक आहे. या दृष्टीने वैदिक साहित्याच्या इतिहासाचे अवलोकन, चिंतन होणे आवश्यक आहे.

**उद्दिष्टे :**

१) ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद यांचे ज्ञान प्राप्त करणे.
२) वेदकालीन संस्कृती व इतिहास यांचा अभ्यास करणे.
३) ब्राह्मणे, आरण्यके व उपनिषदे यातील कथा आणि तत्त्वज्ञान यांचे तुलनात्मक अध्ययन करणे.
४) वैदिक साहित्याच्या इतिहासाची उपयुक्तता स्पष्ट करणे.

**फलिते :**

१) ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद यांचे प्राप्त होते.
२) वेदकालीन संस्कृती व इतिहास अभ्यास करतो.
३) ब्राह्मणे, आरण्यके व उपनिषदे यातील कथा आणि तत्त्वज्ञान यांची तुलनात्मक अभ्यास करतो.
४) वैदिक साहित्याच्या इतिहासाची उपयुक्तता स्पष्ट करतो.

**अभ्यासक्रम**

| अनु. क्र. | घटकाचे नाव |
|---|---|
| १ | ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद |
| २ | ब्राह्मणग्रंथ, आरण्यकग्रंथ |
| ३ | उपनिषदे |
| ४ | वेदांगे |

**संदर्भग्रंथ सूची :**

१) Keith A. B. *A History Of Sanskrit Literature*. London : Oxford University Press, First Reprint Edn.1961.

२) त्रिपाठी रामशंकर. *संस्कृत साहित्य का प्रामाणिक इतिहास*. वाराणसी : श्रीकृष्णदास अकादमी, प्रथमावृत्ती. १९९६.

३) करंबेळकर वि. वा. *संस्कृत साहित्याचा सोपपत्तिक इतिहास.* नागपूर : हिंदुधर्म संस्कृती मंदिर, प्रथमावृत्ती. १९५४.

४) तुंगार ना. वा. *संस्कृत भांडार परिचय.* पुणे, प्रथमावृत्ती. १९४२.

**प्रश्नपत्रिका स्वरूप व गुणविभागणी :**

| | |
|---|---|
| प्रश्न १. वस्तुनिष्ठ प्रश्न (बहुपर्यायी) | ०५ गुण |
| प्रश्न २. सामान्यप्रश्न/ सामान्यप्रश्न (वेदांवर आधारित) | १० गुण |
| प्रश्न ३. सामान्यप्रश्न/ सामान्यप्रश्न (आरण्यकग्रंथ / वेदांगे) | १० गुण |
| प्रश्न ४. विवेचक परिच्छेद लिहा.(५ पैकी ३) (ब्राह्मणग्रंथ व उपनिषदांवर आधारित) | १५ गुण |
| | ------------------- |
| | एकूण गुण ४० |
| | ------------------- |

शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

वर्ग : बी.ए.भाग – ३, विषय : संस्कृत (DSE-E-144)

सुधारित / नवीन अभ्यासक्रम (CBCS) जून २०२० पासून

सत्र क्र: ६, पेपर क्रमांक :१५

**शीर्षक : भामिनीविलास**

**प्रस्तावना :**

जगन्नाथ पण्डित हे साहित्य, व्याकरण, दर्शन या सर्व शास्त्रांचे निष्णात विद्वान म्हणून ज्ञात आहेत. ते 'पण्डितराज' म्हणून प्रसिद्ध आहेत. साहित्यशास्त्र आणि काव्य यांचा ज्ञाता असलेल्या जगन्नाथ पण्डितांनी 'भामिनीविलास' हा स्फुटकाव्यग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथातील प्रास्ताविक विलासालाच 'अन्योक्ति-विलास' असे संबोधिले जाते. पशु, पक्षी, वृक्ष इ.विषयांवर आधारित असा हा अन्योक्तींचा संग्रह आहे. साभिप्राय असलेल्या या अन्योक्ती विद्यार्थ्यांमध्ये जीवनमूल्ये रुजविण्यासाठी, तसेच मार्गदर्शक स्वरूपातील आहेत.

**उद्दिष्टे :**

१) विद्यार्थ्यांना संस्कृतमधील स्फुटकाव्यग्रंथांचा परिचय करून देणे.
२) अभिजात संस्कृत वाङ्मयाची ओळख करून देणे.
३) पण्डित जगन्नाथांच्या काव्यशैलींची वैशिष्ट्ये विशद करणे.
४) 'भामिनीविलास' यातील मार्गदर्शन जीवनमूल्यांची उपयोगिता विद्यार्थ्यांना स्पष्ट करून देणे.

**फलिते :**

१) विद्यार्थ्यांना संस्कृतमधील स्फुटकाव्यग्रंथांचा परिचय होतो.
२) अभिजात संस्कृत वाङ्मयाची ओळख होते.
३) पण्डित जगन्नाथांच्या काव्यशैलींची वैशिष्ट्ये विशद करतात.
४) 'भामिनीविलास' यातील मार्गदर्शन जीवनमूल्यांची उपयोगिता विद्यार्थी अंगीकारतात.

**अभ्यासक्रमासाठी पाठ्यपुस्तक : 'भामिनीविलास' ऑफ जगन्नाथ – प्रास्ताविक विलास, संपा.- डॉ. शिवदास जाधव, श्रीरामकृष्ण प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००२**

**संदर्भग्रंथ सूची :**

१) मिश्र राधेश्याम. *भामिनीविलास.* वाराणसी : चौखम्बा संस्कृत संस्थान, तृतीयावृत्ती. १९९४.
२) परब का. पां., पणशीकर वा. ल. *भामिनीविलास.* मुंबई : निर्णयसागर मुद्रणालय, तृतीयावृत्ती. १९९३.

**प्रश्नपत्रिका स्वरूप व गुणविभागणी :**

| | |
|---|---|
| प्रश्न १. वस्तुनिष्ठ प्रश्न (बहुपर्यायी) | ०५ गुण |
| प्रश्न २. भाषांतर लिहा. (३ पैकी २) | १० गुण |
| प्रश्न ३. सामान्यप्रश्न/ सामान्यप्रश्न | १० गुण |
| प्रश्न ४. विवेचक परिच्छेद लिहा.(५ पैकी ३) | १५ गुण |
| | --------------------- |
| | एकूण गुण ४० |
| | -------------------- |

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

वर्ग - बी. ए. भाग – ३, विषय : संस्कृत(DSE-E145)

सुधारित / नवीन अभ्यासक्रम(CBCS) जून २०२० पासून

सत्र - ६,पेपर क्रमांक - १६

**शीर्षक : व्याकरण आणि भाषिक कौशल्ये**

Credits: 04 Total Teaching Hours: 60

**प्रास्ताविक :**

संस्कृत भाषेच्या व्याकरणाची परंपरा अत्यंत प्राचीन व समृद्ध आहे. वैदिक व अभिजात संस्कृत भाषेतील कौशल्ये आत्मसात करण्यासाठी व्याकरणाचे अध्ययन आवश्यक आहे. संस्कृत भाषेचे शिक्षण अर्थातच संस्कृत लेखन, वाचन त्यातील शब्दसंपत्तीची ओळख ही व्याकरणाच्या माध्यमातून होते.

यद्यपि बहु नाधिषे तथापि पठ पुत्र व्याकरणम् |
स्वजनो श्वजनो मा भूत् सकल: शकल: सकृत् शकृत ||

या उक्तीला अनुसरून भाषिक कौशल्यासाठी व्याकरणाचे अध्ययनन करणे नितांत गरजेचे आहे.

**उद्दिष्टे :**

१) संस्कृत व्याकरण परंपरेचे अध्ययन करणे.
२) संस्कृत संधिप्रकारांचा अभ्यास करणे.
३) संस्कृत विभक्त्यर्थाचे अध्ययन करणे.
४) व्याकरणाच्या अभ्यासाद्वारे भाषिक कौशल्ये आत्मसात करणे.

**फलिते :**

१) संस्कृत व्याकरणाच्या अध्ययनाने संस्कृत व्याकरण परंपरेचे ज्ञान होते.
२) संस्कृतमधील अच् ,हल् ,विसर्ग हे संधिप्रकार समजतात.
३) संस्कृत कारके वाक्यरचनेसाठी सहाय्यक व उपयुक्त होतात.
४) व्याकरणाच्या अभ्यासाद्वारे भाषिक कौशल्ये आत्मसात होतात.

**पाठ्यपुस्तक – वरदराजरचित लघुसिद्धान्तकौमुदी**

**अभ्यासक्रम**

| अनु. क्र. | घटकाचे नाव |
|---|---|
| १ | संस्कृत व्याकरण परंपरा |
| २ | हल् संधि |
| ३ | अच् संधि |
| ४ | विभक्त्यर्थ |

**संदर्भग्रंथ सूची :**

१) गायकवाड राजेंद्रशास्त्री (संपा.). *लघुसिद्धान्तकौमुदी - एक परिशीलन.* लातूर : निकिता प्रकाशन, नवीन आवृत्ती. २००५.

२) जोशी माधव गणेश. *पाणिनीय संस्कृत व्याकरण.* आळंदी देवाची : साधकाश्रम, प्रथमावृत्ती. १९९२.

३) आचार्य नारायण राम (संपा.). *लघुसिद्धान्तकौमुदी.* मुंबई : निर्णय सागर मुद्रणालय, चौदावी आवृत्ती. १९४८.

४) ठक्कुर कनकलाल (संपा.). *लघुसिद्धान्तकौमुदी.* वाराणसी : चौखंबा संस्कृत सिरीज ऑफिस, चतुर्थावृत्ती. १९७१.

**प्रश्नपत्रिका स्वरूप व गुणविभागणी :**

| | |
|---|---|
| प्रश्न १. वस्तुनिष्ठ प्रश्न (बहुपर्यायी) | ०५ गुण |
| प्रश्न २. सामान्यप्रश्न/ सामान्यप्रश्न | १० गुण |
| प्रश्न ३. सामान्यप्रश्न/ सामान्यप्रश्न | १० गुण |
| प्रश्न ४. सूत्रे स्पष्ट करा. (५ पैकी ३) | १५ गुण |

-----------------------

एकूण गुण - ४०

-----------------------

❀❀❀

# शिवाजी विद्यापीठ ,कोल्हापूर

## संस्कृत

## समकक्ष पेपर्स (शीर्षकासह)

B.A.Part -III

| जून २०१५ पासून (जुना अभ्यासक्रम) | | | | जून २०२० पासून (नवीन अभ्यासक्रम) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Sr.No. | Semister | Paper no. | Title of the paper | Semister | Paper no. | Title of the paper |
| 1. | V | VII | वेद | V | VII | वेदोक्त सूक्ते |
| 2 | V | VIII | दर्शन | V | VIII | वेदान्त |
| 3 | V | IX | तर्कशास्त्र | V | IX | तर्कसंग्रह |
| 4 | V | X | साहित्यशास्त्र | V | X | काव्यशास्त्र |
| 5 | V | XI | पुराविद्या | V | XI | पुरातत्त्वविद्या |
| 6 | VI | XII | ब्राह्मणोपनिषदे | VI | XII | बृहत्संहिता |
| 7 | VI | XIII | धर्मशास्त्र | VI | XIII | याज्ञवल्क्यस्मृती |
| 8 | VI | XIV | वैदिक साहित्याचा इतिहास | VI | XIV | वैदिकसाहित्यावलोकन |
| 9 | VI | XV | वैदिकोत्तर साहित्य | VI | XV | भामिनीविलास |
| 10 | VI | XVI | व्याकरण | VI | XVI | व्याकरण आणि भाषिक कौशल्ये |

Structure III : B.A. Programme Specific(Sanskrit)

Sem V –Duration: 6 Months

| Teaching Scheme | | | | | Evaluation Scheme | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr.No. | Course | Course Name | No. of Lectures | Hours | Credits | Theory | Internal | Total | Min. Marks(For Passing) (Theory+ Internal) | Exam. Duration (Hrs.) |
| 1 | DSE-E16-VII | वेदोक्त-सूक्ते | 4 | 3.2 | 4 | 40 | 10 | 50 | 14+4=18 | 2 |
| 2 | DSE-E17-VIII | वेदान्त | 4 | 3.2 | 4 | 40 | 10 | 50 | 14+4=18 | 2 |
| 3 | DSE-E18-IX | तर्कसंग्रह | 4 | 3.2 | 4 | 40 | 10 | 50 | 14+4=18 | 2 |
| 4 | DSE-E19-X | काव्यशास्त्र | 4 | 3.2 | 4 | 40 | 10 | 50 | 14+4=18 | 2 |
| 5 | DSE-E20-XI | पुरातत्त्वविद्या | 4 | 3.2 | 4 | 40 | 10 | 50 | 14+4=18 | 2 |
| | | Total | 20 | 16 | 20 | 200 | 50 | 250 | - | - |

## Structure III : B.A. Programme Specific(Sanskrit)
## Sem.- VI–Duration: 6 Months

| Teaching Scheme | | | | | Evaluation Scheme | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr.No. | Course | Course Name | No. of Lectures | Hours | Credits | Theory | Internal | Total | Min. Marks(For Passing) (Theory+ Internal) | Exam. Duration (Hrs.) |
| 1 | DSE-E141-XII | बृहत्संहिता | 4 | 3.2 | 4 | 40 | 10 | 50 | 14+4=18 | 2 |
| 2 | DSE-E142-XIII | याज्ञवल्क्यस्मृती | 4 | 3.2 | 4 | 40 | 10 | 50 | 14+4=18 | 2 |
| 3 | DSE-E143-XIV | वैदिक साहित्यावलोकन | 4 | 3.2 | 4 | 40 | 10 | 50 | 14+4=18 | 2 |
| 4 | DSE-E144-XV | भामिनी-विलास: | 4 | 3.2 | 4 | 40 | 10 | 50 | 14+4=18 | 2 |
| 5 | DSE-E145-XVI | व्याकरण आणि भाषिक कौशल्ये | 4 | 3.2 | 4 | 40 | 10 | 50 | 14+4=18 | 2 |
| | | Total | 20 | 16 | 20 | 200 | 50 | 250 | - | - |

DSE : Discipline Specific Elective – Candidate can opt any one course (Subject) Form DSC {Course (Subject) which was opted in Part II (Sem.III &IV)}

**Note: DSE Paper No. VII to XVI are elective papers whereas, DSC Paper No. I to VI are core courses. Hence, DSE paper VII to XVI should be considered in continuation of DSC I to VI**